Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# वस्तू व सेवा करांचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परीणाम

**प्रा.डॉ.विश्वनाथ गोंविद कंधारे**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
वै. धुंडा महाराज देगलुरकर महाविद्यालय,
देगलुर जि.नांदेड

- **प्रस्तावना**

स्वातंत्र्य पूर्व काळापासुन भारतात विवीध प्रकारचे अप्रत्यक्ष कर आस्तिवात होते.परंतु या करात सपुंर्ण देशभरात एक समानता नव्हती, कांही राज्य अधिक कर कांही राज्यात कमी कर आकारले जात होते त्यामुळे आंतरराज्य व्यापार सुरळीत होत नव्हाता म्हणुन केंद्र सरकारने संपुर्ण देशामध्ये एकच कर प्रणाली असावी असा विचार मंत्री मंडळासमोर मांडणी केली गेली त्यातूनच वस्तू व सेवा कर (Goods and Service Tax) प्रणालीचा उदय झाला. वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणी करीता संविधानात बदल करण्याची आवश्यकता होती त्यानुसार बदल करण्याचे विधेयक (१२२ वी घटना दुरुस्ती) लोकसभेत मांडण्यात आले व लोकसभेने वस्तू व सेवा कर विधेयक ६ मे १९१५ रोजी समत केले. लोकसभेने पारीत केलेले विधेयक समंतीकरीता राज्यसभेकडे पाठविण्यात आले. राज्यसभेने कांही बदलासह वस्तू व सेवा कर विधेयक दिनांक ०३/०८/२०१६ रोजी पारीत केले व बदलासह विधेयक लोकसभेकडे पाठविण्यात आले. राज्यसभेने सुचवीलेले बदल लोकसभेध्ये दि.०८/०८/२०१६ रोजी स्विकृत केले व त्यास वस्तू व सेवा कर कायदा - २०१४ असे त्यास नाव देण्यात आले..संपूर्ण देशामध्ये हा अप्रत्यक्ष कर कायदा लागु करण्यासाठी ३० जुन २०१७ रोजीच्या रात्री संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आले व त्याच दिवसी हे विधेयक मान्यतेसाठी राष्ट्रपतीकेडे पाठवण्यात आले.राष्ट्रपती भवनाने ही लगेचच या कर विधेयकाला मान्यता दिली आणि संपुर्ण देशात ०१ जुलै २०१७ पासुन संपूर्ण देंशभरात वस्तू व सेवा कर लागू झाल्याचे जाहीर करण्यात आले.

- **वस्तू व सेवा कराचा जागतिक इतिहास**

१९८६ साली जगामध्ये सर्वप्रथम वस्तू व सेवा कराची सूरुवात न्युझलँड या देशाने केली. त्यानंतर १९९१ कॅनडा, १९९४ शिंगापुर, २००० ऑस्ट्रलिया आणि २०१६ मध्ये मलेशिया या देशात वस्तू व सेवा कर लागू झाले. भारताचा विचार केल्यास देशामध्ये अप्रत्यक्ष कराला प्रर्याय म्हणुन १९८६ मध्ये अर्थमंत्री व्हि.पी.सिंग यानी Modified Value Added Tax ची संक्लपना मांडली होती परंतु या मध्ये अनेक दोष दिसुन आल्यामुळे २००० मध्ये माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यानी वस्तू व सेवा कराची संकल्पना सर्वप्रथम मंत्री मंडळासमोर मांडली. परंतु ब-याच अडचणी मुळे त्यांच्या काळात वस्तू व सेवा कर देशामध्ये लागु करणे शक्य झाले नाही त्याला २०१७ साल उजाडले.

- **GST मध्ये समावेश होणारे कर**

भारतामध्ये वस्तू व सेवा कर लागू झाल्यामूळे राज्य सरकारचे व केंद्र सरकारची अनेक करांचा समावेश GST मध्ये करण्यात आला ते खालील प्रमाणे.

१ केंद्रिय अबकारी कर
२ अतिरिक्त सिमा शुल्क
३ केद्रिय विक्रि कर
४ मुल्य वर्धित कर
५ व्यवसाय कर
६ प्रवेश कर
७ करमनुक कर
८ राज्य स्तरावरील मुल्य वर्धित कर

९ जकात कर
१० जाहीरात कर
११ खरेदी कर

- **भारतामध्ये वस्तू व सेवा कराचे दर**

भारतामध्ये ५ % ते २८% असे वस्तू व सेवा कराचे दर आहेत ते विवीध वस्तू व सेवांवर आकारले जातात.

| वस्तू व सेवा कराचे दर | कांही प्रमुख वस्तु | कांही प्रमुख सेवा |
|---|---|---|
| ५% | साठवलेला भाजीपाला, खते मसाले, प्लास्टिक वेस्ट | न्युज पेपर, टेकवे फुड, रेस्टॉरेन्ट |
| १२% | तुप नटस, फळे,पाकिटे,पर्स आणि बॅग | टेंपररी बेसीक, IP राइटस, विकण्यास तयार असणारी इमारत |
| १८% | वाशिंग मशीन,कॅमेरा, शॅम्पो | आउटडोर कॅटरींग, IT सर्विसेस, टेलीकॉम सर्विसेस |
| २८% | सनसस्क्रिन,मोटार सायकल, पान मसाला | सिनेमा, फुड अँड डिंक्स इन फाईव्ह स्टार हॉटेलस |

- **भारतामध्ये वस्तू व सेवा कराचे प्रकार**

भारत हे एक संघराज्य देश आहे. या मध्ये केंद्रसरकार, राज्यसरकार आणि अनेक केंद्रशासीत प्रदेश आहेत. त्याच्यांत सत्ता, जबाबदारी आणि महसुला बाबद स्पष्टपणे सीमाकंन आहे म्हणून वस्तू व सेवा करांचे तीन प्रकार पाडले आहेत.

१ केद्रिंय वस्तू व सेवा कर (Central GST) - या मध्ये केंद्राच्या कर संकलनाचा समावेश होतो.
२ राज्य वस्तू व सेवा कर (State GST) - या मध्ये कर आकारण्याची जाबाबदारी राज्य सरकारची असते त्यात केंद्रं सरकार हस्तक्षेप करीत नाही.
३ इंटिग्रेटेड वस्तू व सेवा कर (Integrated GST) - यामध्ये कर संकलन केंद्रशासीत प्रदेश करीत असतात. थोडक्यात असे सांगता येईल की राज्य अथवा केंद्रशासीत प्रदेशामध्ये जे कर गोळा होत असतात त्यात राज्यसरकार व केद्रशासीत प्रदेशाला ५० टक्के व केंद्रसरकारला ५० टक्के रक्कम विभागली जाते.

- **केंद्रसरकारला वस्तू व सेवा करा पासुन मिळणार महसुल:** भारतातील केंद्रसरकार, राज्यसरकार आणि अनेक केंद्रशासीत प्रदेशांना खालील प्रमाणे वस्तू व सेवा कर मिळत असतो.

| महीना / वर्षे | २०२१-२२ (कोटी रु) | २०२०-२१ (कोटी रु) | २०१९-२० (कोटी रु) | २०१८-१९ (कोटी रु) | २०१७-१८(कोटी रु) |
|---|---|---|---|---|---|
| एप्रिल | १४१,३८४ | ३२,२९३ | ११३,८६५ | १०३,४५९ | ----- |
| मे | १०२,७०९ | ६२,००९ | १००,२८९ | ९४,०१६ | ----- |
| जुन | ----- | ९०,९१७ | ९९,९३८ | ९५,६१० | ----- |
| जुलै | ----- | ८७,४२२ | १०२,०८३ | ९६,४८३ | २१,५७२ |
| ऑग्स्ट | ----- | ८६,४४९ | ९८,२०३ | ९३,९६० | ९५,६३३ |
| सप्टेंबर | ----- | ९५,४४८ | ९१,९१७ | ९४,४४२ | ९४,०६४ |
| ऑक्टोबंर | ----- | १०५,१५५ | ९५,३८० | १००,७१० | ९३,३३३ |
| नोव्हेंबर | ----- | १०४,९३६ | १०३,४९१ | ९७,६३७ | ८३,७५० |
| डिसेंबर | ----- | ११५,१७४ | १०३,१८४ | ९४,६३७ | ८४,३१४ |
| जानेवारी | ----- | ११९,८७५ | ११०,८१८ | १०२,५०३ | ८९,८२५ |
| फेब्रुवारी | ----- | ११३,१४३ | १०५,३६५ | ९७,२४७ | ८५,९६२ |
| मार्च | ----- | १२३,९०२ | ९७,५९७ | १०६,५४७ | ९२,१६७ |

स्त्रोत https://en.wikipedia.org/wiki/Goods_and_Services_Tax_(India)_Revenue_Statistics

वरील तक्त्यावरुन असे दिसुन येते कि केंद्रंसरकारला महिण्याला जवळपास एक लाख कोटि रूपये वस्तू आणि सेवा करापासुन मिळत आहे हि देशाच्या अर्थव्यवथेच्या बाबत जमेची बाजु आहे.

- **वस्तू व सेवा करांचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परीणाम-**

वस्तू आणि सेवा कराचे १ जुलै २०१७ पासून संपूर्ण देशामध्ये अमलबजावणी झाली तेंव्हा पासुन ते आज पर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेवर अनेक चांगले आणि वाईट परीणाम झाल्याचे दिसुन येते ते परीणाम खालील प्रमाणे.

- **वस्तू व सेवा करांचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील चांगले परीणाम**

१) **करावर कर लावला जाणार नाही.**

जून्या अप्रत्यक्ष कर प्रणालीमध्ये करावर कराची आकारणी केली जाते. उदा.उत्पादीत वस्तूवर केंद्रसरकार दवारे लावण्यात येणा-या उत्पादन शुल्कावर विक्रीकराची आकारणी होते. त्यामूळे ग्राहकाचे नुकसान होत होते आता होणार नाही.

**२) एका कराची वजावट दुस-या करदात्याला मिळते.**

मुल्य वर्धित कर राज्य शासनामार्फत व उत्पादन शुल्क व सेवा शुल्क केंद्रशासना मार्फत आकारले जातात. सदर कराची आकारणी केंद्र व राज्य सरकार तर्फे स्वतंत्रपणे केली जाते त्यामुळे एका कराची वजावट दुसरा कर भरताना दिली जात नाही. मात्र या करामध्ये तश्या चुका होणार नाहीत.

**३) २ टक्के विक्रि करामध्ये सुट मिळते.**

वस्तू आणि सेवा कराच्या पुर्वी केंद्रिय विक्रीकर कायदा आस्तिवात होता त्याकायदयानुसार आंतरराज्य माल विक्रिवर २ टक्के विक्रि करा आकारला जात होता आणि ज्या राज्यात या मालाची विक्रि केली जाते त्या राज्यात पुन्हा प्रचलीत कर आकारला जातो त्यामूळे हा वाढतच जातो परंतु नवीन वस्तू आणि सेवा करामुळे ग्राहाकाचा व विक्रत्याचा फायदा होतो.

**४) संपूर्ण देशामध्ये आता वस्तूच्या किमती एकच असतील**

या पुर्वी भारतात प्रत्येक राज्याचे वस्तूवरील कराचे दर वेगवेगळे होते त्यामुळे त्या वस्तूच्या किमतीही वेगवेगळया होत्या आता मात्र संपूर्ण भारतभर एकच किमती असतील.

**५) कराची किचकट पध्दत बंद झाली.**

करदात्याला एकापेक्ष अनेक कर कायदयाचे पालन करावे लागत असल्याने अनेक कायदयाच्या तरतूदी लक्षात ठेवाव्या लागत होत्या, त्याच प्रमाणे विवरणपत्र अचुक येत नव्हती आता मात्र यात अडचणी येणार नाहीत.

**६) नोकरवर्ग अधिकारी व कार्यालये कमी झाले**

GST च्या पुर्वी राज्य सरकारला व केंद्रसरकारला कर वसुली करण्यासाठी वेगवेगळी कार्यालये, अधिकारी आणि कर्मचारी यांची नेमनुक करावी लागत असत त्यासाठी मोठयाप्रमाणावर खर्च होत होता आता तो फारच कमी होइल.

**७) सरकारच्या कर संकलनात वाढ.**

देशामध्ये जुलै २०१७ पासून वस्तू आणि सेवा कराची आकारणी केली जात आहे सुरूवातीच्या कांही महीण्यामध्ये मोठया प्रमाणावर कर महसूल मिळाला नाही परंतू सध्याच्या काळात यात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसुन येते. उदा.एप्रिल २०२१ साली १४१,३८४ तर मे महिण्यात १०२,७०९ इतका प्रंचड कर मिळाला.यावरुन वस्तू आणि सेवा कराचे महत्व दिसुन येते.

**८) पारदर्शकता**

वस्तू व सेवा कर प्रणाली मध्ये कर आकारणी बाबात फारच पारदर्शकता आहे त्यामुळे व्यापारी, घाउक विक्रते, आयातदार व निर्यात दार याना परेशान होण्याची गरज नाही.

**९) विदेशी गूंतवनुकीमध्ये वाढ होत आहे.**

देशामध्ये वस्तू व सेवा कर प्रणाली ही मूळातच एक कर एक राष्ट्र या उदेशाने सुरु केली आहेत त्यामुळे विदेशी गुंतवनुकदाराना भारतीय बाजारपेठेत गुतंवनुक करण्यात कोणत्याही अडचणी येत नाहीत.

**१०) आयात व निर्यात उदयोगाना चालना मिळेल.**

जुलै २०१७ पासुन सपुर्ण भारतभर वस्तू व सेवा कर लागू करण्यात आला आहे त्यामुळे आयातदार व

निर्यातदार यानां व्यापार करण्यासाठी मोठयाप्रमाणावर अडचणी निर्माण होत नाहीत त्यामूळे आयात व निर्यात उदयोगाना चालना मिळेल.

**११) ब-याच वस्तूच्या किमंती कमी होतील.**

वस्तू व सेवा कर प्रणाली मध्ये काही वस्तूवर ५ टक्के तर कांही वस्तूवर १२, टक्के, १८ टक्के , २८ टक्के इतका कर आकारला जातो त्यामूळे नक्कीच ५ टक्के कर असणा-या वस्तूच्या किमतीं कमी होतील.

**१२) कर चुकवेगिरी होणार नाही.**

पूर्वीच्या अप्रत्यक्ष कर प्रणाली मध्ये व्यापारी वर्ग मोठयाप्रमाणावर करचोरी करीत होते पण या प्रणाली मध्ये असे होणार नाही कारण ही प्रणाली १०० टक्के Online पध्दतीची आहे.

- **वस्तू व सेवा करांचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील वाईट परीणाम**

**१) राज्य सरकारचे आर्थिक नुकसान होईल**

वस्तू व सेवा कर प्रणालीच्या पुर्वी विक्रि कर हा राज्यसरकारची दुभती गाय होती परंतु आता वस्तू व सेवा कराच्य अमलबजावणी मुळे राज्याला सतत केंद्राच्या मदतीकडे / अनुदानाकडे पाहात राहावे लागत आहे.

**२) ब-याच वस्तूच्या किमती वाढतील**

उदा. सनसस्क्रिन,मोटार सायकल, पान मसाला, सिनेमा, फुड अँड डिंक्स इन फाईव्ह स्टार हॉटेलस यावर २८ टक्के कर लावला आहे.

**३) सॉफ्ठवेअरच्या किमतीत वाढ होईल.-**

कारण सॉफ्ठवेअर, IT सर्विसेस, टेलीकॉम सर्विसेस यावर १८ टक्के कर लावला जातो त्यामुळे या वस्तूच्या किमती वाढतील.

**४) वस्तूची मागणी कमी होईल**

वाशिंग मशीन,कॅमेरा, शॅम्पो, आउटडोर कॅटरींग, IT सर्विसेस, टेलीकॉम सर्विसेस यावर १८ टक्के GST तर आउटडोर कॅटरींग, IT सर्विसेस, टेलीकॉम सर्विसेस, सिनेमा, फुड अँड डिंक्स इन फाईव्ह स्टार हॉटेलस वर २८ टक्के GST लावला जातो त्यामूळे अशा वस्तूची मागणी कमी होईल.

**५) जीवन विम्याचा हप्ता वाढेल.**

जीवन विमाच्या हपत्यावर १८ टक्के GST आकारला जातो त्यामूळे महिण्याला, सहा महिण्याला किंवा वर्षाला भरला जाणारा हप्ता वाढला जाईल.

**६) घराच्या किमती वाढतील.**

वस्तू व सेवा कर प्रणालीमध्ये तयार घराच्या विक्रिवर १२ टक्के GST आकारला जाणार आहे त्यामूळे तयार घराच्या किमतीं वाढतील.

**७) लहान उधोगांना अडचणीचे**

वस्तू व सेवा कर प्रणालीमध्ये कराचे सर्व व्यवहार हे Online पध्दतीने केले जात आहेत त्यामूळे लहान उदयोगाना यासाठी विवीध Software ची खरेदी करावी लागते.

**८) GST Software चा खर्च अधिक.**

१ जुलै २०१७ पासून लहान मोठया कंपन्याना कर भरणा करण्यासाठी GST Softweare ची आवश्यकता आहे असे Software विकत घेण्यासाठी व चालवण्यासाठी मोठया प्रमाणावर खर्च आवश्यकत आहे.

थोडक्यात वस्तू व सेवा कर प्रणालीमध्ये वरील अनेक प्रकारचे दोष असले तरी या प्रणालीचा सरकार आणि ग्राहक यांचा फायदाच होईल.

**संदर्भ सुची:**

१. डॉ.दिलीप सातभाई, जीएटीचे फायदे व तोटे, मायबोली ऑनलाईन ब्लॉग ०७/०६/२०१७
२. Advantages and Disadvantages of GST-Masters India
३. https://www.bajajfinserv.in
४. https://mr.vikaspedia.in
५. https://en.wikipedia.org/wiki/Goods_and_Services_Tax_(India)